R.No. MHHMAR/25/A3029

दैनिक
# महावृत्त

E-mail:dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ४

दि. १० डिसेंबर २०२५, वार : बुधवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## संसदीय अभ्यासवर्गातून लोकशाहीची प्रक्रिया समजून घेण्याची संधी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



नागपूर: भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाची रचना केली. या संविधानात नागरिकांच्या आशा, आकांक्षा, अपेक्षा पूर्ण करता येईल, अशी व्यवस्था केली. अनेक आव्हानांचा सामना करत आपली लोकशाही, संविधानिक संस्था प्रगल्भ झाल्या. संसदीय लोकशाहीची अतिशय सुंदर अशी रचना देखील संविधानाने केली आहे. संसदीय अभ्यासवर्गातून लोकशाहीची प्रक्रिया समजून घेण्याची संधी मिळते, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानभवन येथे ५१ व्या संसदीय अभ्यासवर्गाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड.राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्यमंत्री तथा राष्ट्रकुल संसदीय मंडळाचे कोषाध्यक्ष ड.आशिष शेलार, विधानमंडळ सचिव मेघना तळेकर आदी उपस्थित होते.

संसदीय अभ्यासवर्ग लोकशाहीची ओळख करून देणारा वर्ग आहे. पुस्तकी अभ्यासक्रमांमध्ये आपण लोकशाहीची मूल्ये, प्रक्रिया वाचतो. अभ्यासवर्गात मात्र ही प्रक्रिया जवळून बघता येते. राज्याचा कारभार कसा चालला पाहिजे याचा नियम संविधानाने दिला. विधानसभा आणि विधानपरिषद या दोनही सभागृहाचे नियम, त्यातील एक एक शब्द, तरतूद संविधानाच्या आधारावरच झाली आहे. विधानमंडळाच्या कामकाजाची सुंदर रचना संविधानाने दिली, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

विधानमंडळात विविध प्रकारचे कायदे केले जातात. हे कायदे लोकांच्या आशा, अपेक्षा पूर्ण करणारे असतात. कायदे तयार होत असताना सभागृहात होत असलेली चर्चा गुणात्मक असते. राज्यातील शेवटच्या माणसावर एखाद्या कायद्याचा काय परिणाम होईल, याची बाजू देखील सभागृहात मांडली जाते. विधानमंडळाच्या मंजुरीशिवाय राज्याच्या तिजोरीतील एक रुपया देखील खर्च होऊ शकत नाही. विभागांना आपल्या मागण्या सभागृहासमोर ठेवाव्या लागतात. त्यावर चर्चा होते, मान्यतेनंतर अर्थसंकल्प तयार होतो आणि त्यानंतर कायदा तयार करावा लागतो. हा कायदा म्हणजे राज्याच्या तिजोरीची चावी आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

राज्यातील एखाद्या छोट्या घटनेचे पडसाद देखील विधिमंडळात उमटत असतात. लोकशाहीची प्रक्रिया विधिमंडळाच्या कामामुळे जीवंत राहते. सभागृहातील सभापती, अध्यक्ष आमचे हेडमास्टर आहेत, त्यांच्या मंजुरीशिवाय सभागृहात कोणतीही गोष्ट होऊ शकत नाही. संसदीय लोकशाहीत विविध प्रकारची आयुधे आहेत. ही आयुधे लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी महत्त्वाची साधने आहेत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

विधानमंडळाच्या माध्यमातून लोकशाहीचे प्रतिबिंब -सभापती प्रा. राम शिंदे

भारतीय प्रजासत्ताकाला ७५ वर्ष पूर्ण होत असताना ५१ वा संसदीय अभ्यासवर्ग सुरु होत आहे. आपल्या देशात संसदीय लोकशाहीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विधानमंडळाच्या माध्यमातून लोकशाहीचे प्रतिबिंब उमटत असते. विधानमंडळ सभागृहाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना योजना आणि राज्याला प्रगतीची दिशा देण्याचे काम होते. अभ्यासवर्गातून लोकशाहीशी संबंधित देवाणघेवाण तसेच प्रबोधन, शिक्षण, संवाद आणि सातत्य शिकता येईल, असे सभापती प्रा.राम शिंदे यांनी सांगितले.

संसदीय अभ्यासवर्ग लोकशाही बळकट करण्याचा उपक्रम - अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर

राष्ट्रकुल संसदीय मंडळाचा अभ्यासवर्ग हा सर्वांत जुना आणि महत्वपूर्ण तसेच संसदीय लोकशाही बळकट करण्याच्या प्रयत्नातील एक उपक्रम आहे. संसदीय लोकशाही पद्धत अधिक बळकट करायची असेल तर त्याची माहिती जनमानसापर्यंत पोहोचली पाहिजे. अभ्यासवर्गातून सभागृहाचे कामकाज तसेच संविधानातील तरतुदींचे पालन कसे होते याची माहिती मिळेल, असे विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी सांगितले.

संसदीय अभ्यासवर्ग सर्वांना उपयुक्त - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

भारतीय लोकशाही देशाची खरी ताकद आहे. विविध जाती धर्माचे नागरिक देशात एकत्र नांदतात, ही आपल्या लोकशाहीची किमया आहे. राज्यघटनेने दिलेली संसदीय लोकशाही देशाच्या धोरणांना दिशा देण्याचे काम करते. भारतीय राज्यघटना सर्वोत्तम घटना आहे. त्या आधारेच देश चालतो, लोकशाही कर्तव्याची जाणीव घटना करून देते. संसदीय अभ्यासवर्गातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्षपणे या सर्व गोष्टी अनुभवायला मिळणार आहे. संसदीय अभ्यासवर्ग केवळ विद्यार्थीच नाही तर लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांसाठी देखील उपयुक्त आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

अभ्यासवर्गात राज्यभरातील विविध १२ विद्यापीठांतील राज्यशास्त्र या विषयाचे विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

## तुकडेबंदी सुधारणा कायदा ग्रामीण भागातही उपयुक्त ठरावा - माजी मंत्री, आमदार अमित देशमुख




नागपूर / प्रतिनिधी :- राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी सभागृहात दाखल करण्यात आलेल्या सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९४ - महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्या बाबत व त्यांचे एकत्रीकरण रण्याबाबत सुधारणा विधेयकावर चर्चा करताना तुकडेबंदी सुधारणा कायदा ग्रामीण भागातही उपयुक्त ठरावा लातूरससह नजीकच्या गावातील कबाल्याचे प्रश्र्न मार्गी लागावेत आणि यातून गरीबांचे घरांचे स्वप्न साकार व्हावे, अशी आग्रही मागणी आमदार देशमुख यांनी सभागृहात केली.

सरकारच्या अपयशावर बोट या विधेयकावर बोलताना आमदार अमित देशमुख म्हणाले की, आज हे विधेयक चर्चेला आले असून या विधेयकामुळे ६० लाख घरे आणि १ कोटी २० लाख नागरिकांना फायदा होईल, असे मंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले. आपण जो आज धारण जमिनी तुकडे प्रतिबंध करणारा कायदा काही सुधारणा करून आणत आहात, हे पाहता यात सरकार व प्रशासनाचे अपयश आहे असे म्हणले तर चुकीचे होणार नाही.यातून आपण सामान्य माणसाला दिलासा देण्यासाठी हा कायदा आणत आहेत. कायद्याची घोषणा झाल्यानंतर काहीजण नव्याने जमिनीचे तुकडे पाडण्यास सुरुवात करतील आणि असे करीत असतील तर या कायद्यामुळे त्यांना संरक्षण मिळाले तर याचा फायदा म्हणावा तसा होणार नाही. राज्य सरकारने जो युडीसीपीआर स्वीकारला आहे तरीही काही ठिकाणी या कायद्यामुळे अडचणी निर्माण होतील. हा कायदा आणला तरी गरजुना याचा फारसा उपयोग होईल की नाही हे आत्ताच सांगता येणार नाही असे ते म्हणाले.

ग्रामीण व गावठाण भागाचा मुद्दा आमदार देशमुख यांनी ग्रामीण भागातील नागरिकांच्या अडचणींकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी ते म्हणाले, राज्यात अनेक ठिकाणी ग्रामपंचायत हद्दीत अतिक्रमण झाले आहे, अनेकांनी घरे केली आहेत. अशा ग्रामीण भागातील त्या कालावधीतील गरजू नागरिकांना या कायद्याचा फायदा व्हायला हवा. लातूरमधील कबाल्याचा प्रश्र्न:लातूरमध्ये सुद्धा अनेकजण असे आहेत की, ज्यांना अद्याप कबाले मिळालेनाहीत. अनेक जागा महसूल विभागाच्या आहेत, इतर विभागाच्या देखील आहेत,ज्यामुळे गेली अनेक वर्षे ते नागरिक त्रस्त आहेत. तेव्हा अशा रहिवाशांना देखील या कायद्याच्या माध्यमातून फायदा व्हावा यासाठी प्रयत्न व्हावेत.

असे सांगून आपण हा कायदा नागरी भागासाठी आणत आहात. हे आणताना ग्रामीण भागातील व गावठाण जागेतील नागरिकांना या कायद्यामुळे कसा फायदा होईल याचा विचार सरकारने करावा असे ते म्हणाले. या कायदया संदर्भात सभागृह सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुददयावर बोलतांना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, या कायद्यामुळे बिल्डरांना नाही, तर छोटे तुकडे खरेदी केलेल्या सर्वसामान्य जनतेला फायदा होणार आहे. हा कायदा तुकडा खरेदी करणाऱ्याच्या सातबाऱ्यावर त्यांचे नाव यावे यासाठी आणला आहे. हा कायदा दि. १५ नोव्हेंबर १९६५ ते दि. १५ ऑक्टोबर २०२४ या काळातील जमिनीचे तुकडे पडलेल्या जमीन मालकांना लागू असेल. हा कायदा गावठाण लगतच्या ५०० मीटर परिघीय रहिवासी क्षेत्र पर्यंत नागरी क्षेत्रातील तसेच गावठाणच्या परिघात असलेल्या रहिवासी क्षेत्रांना देखील लागू असेल असे सांगीतले.या कायद्यामुळे सरकारी जागेवर तुकडे पाडले असल्यास, त्याचा फायदा होणार नाही आणि सदर जागा सरकारला परत करावी लागेल. याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दि. ०४ नोव्हेंबर २०२५ रोजी सूचना दिल्या आहेत. आमदार देशमुख यांनी सरकारच्या या विधेयकाचे समर्थन करीत, याचा अधिकाधिक फायदा सर्वसामान्य माणसाला होईल, याची काळजी घ्यावी, अशी मागणी केली.

## विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय लातूर येथे परिचारिकांसाठी आपत्ती व्यवस्थापन विषयावर - महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या वतीने कार्यशाळेचे आयोजन




लातूर /प्रतिनिधी:- दि ६ डिसेंबर २५ रोजी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय लातूर येथे परिचारिकांसाठी, आपत्ती व्यवस्थापन विषयावर - महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या वतीने- भारतीय परिचर्या परिषद, यांच्या मार्गदर्शक सूचना व महाराष्ट्र परिषद यांच्या सूचना व मा. न्यायालय यांच्या आदेशानुसार राज्यातील परिचारिकांना त्यांच्या नोंदणी नूतणीकरणांसाठी विविध निरंतर व्यावसायिक शिक्षण घेऊन १५० क्रेडिट तास मिळविणे बंधनकारक निशुल्क कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी, प्रमुख पाहुणे, संस्थेचे वैद्यकीय अधिक्षक, डॉ सचिन जाधव, अध्यक्षपदी महाराष्ट्र परिचर्या परिषदेचे उपाध्यक्ष व संघटनेचे राज्यकार्याध्यक्ष अरुण कदम, महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना संस्थेच्या अधिसेविका श्रीमती लक्ष्मीबाई आपटे, परिचर्या महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती अश्रि्वनी बेले महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना मुख्यालय लातूर शासन मान्य संघटनेच्या राज्याध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य परिचर्या परिषदेच्या नामनिर्देशित सदस्य व सोलापूर येथील शासकीय प्रशिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ मनीषा शिंदे, संघटनेचे राज्यउपाध्यक्ष भीमराव चक्रे, अंबाजोगाई शाखेच्या अध्यक्ष श्रीमती आशा यादव, कार्यशाळेचे निरीक्षक श्री अझर शेख, ईत्यादींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रतिमा पूजन करुन अभिवादन करण्यात आले. प्रास्तविक राज्यसरचिटणीस सुमित्रा तोटे यांनी केले. ज्या ज्या वेळी या संस्थेत छोट्या मोठ्या आपत्कालीन परिस्थिती उद्भवतात तेंव्हा मा. वैद्यकीय अधिक्षक आपल्या टीमसह तत्परतेने अग्रस्थानी असतात त्यामुळे कर्मचाऱ्यांनाही काम करण्यास हुरूप येतो. तसेच ते नेहमीच कर्मचाऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन योग्य उपाय योजना करण्याचा प्रयत्न करतात. तसेच, मा. अधिष्ठाता व संस्थेतील दोन्ही अधिसेविका यांचे सुद्धा ही कार्यशाळा आयोजन करण्यासाठी सहकारी लाभले. त्यासाठी आभार मानले. यावेळी मा. वैद्यकीय अधिक्षक डॉ सचिन जाधव यांनी मार्गदर्शन करताना नर्सिंग ऑफिसर यांचा रुग्णसेवेत महत्वाचा भाग असून निरंतर शिक्षण घेत राहणे आवश्यक असून या संस्थेत परिचारिकांसाठी शासन मान्य संघटनेच्या माध्यमातून असे शैक्षणिक कार्यशाळेचे आयोजन केल्याबद्दल कौतुक केले.

भीमराव चक्रे - राज्यउपाध्यक्ष यांनी परिचारिकांनी निरंतर व्यावसायिक शिक्षण तर घेतलेच पाहिजे त्याहून अधिक सर्वजण अनेक वर्षांनंतर एकत्र येऊन भेटीगाठी घेणे यामुळे आपले मानसिक आरोग्य सुधारते व यानिमित्ताने तेही शक्य होईल असे सुचवले व संघटनेच्या माध्यमातून परिचारिकांच्या कल्याणासाठी सुरू असलेल्या कार्याबद्दलची माहिती दिली. महाराष्ट्र परिचर्या परिषदेकडे संघटनेच्या माध्यमातून विविध अडचणी मांडल्या गेल्या आणि त्याची दखल घेऊन परिषदेच्या संचालक मंडळाने योग्य कार्यवाही केली त्याबबद्दल आभार व्यक्त केले. डॉ मनीषा शिंदे यांनी सुद्धा संघटनेच्या कार्याबद्दल माहिती दिली. अधिसेविका श्रीमती लक्ष्मीबाई आपटे यांनी संघटनेने आयोजित केलेल्या कार्यशाळेचे कौतुक केले. कार्यशाळा निरीक्षक यांनी उपस्थितांना दिवसभर होणाऱ्या विविध विषयाचे ज्ञान परिचारिकांनी अवगत करावे असे आवाहन केले. तर श्री अरुण कदम यांनी अध्यक्षीय समारोप करताना प्रत्येकाने जमेल तसे ज्ञानार्जन केले पाहिजे व त्याचे महत्व समजावून निशुल्क निरंतर व्यावसायिक शिक्षण आयोजित केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले.

या कार्यशाळेत डॉ मनीषा शिंदे, अनंत पवार, डॉ आदिम सय्यद, शुभम वानखेडे, विवेकानंद कोडगिरे, विरेश महाजनी इत्यादी तज्ञांनी आपत्ती व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रुपाली दिघे व अश्रि्वनी विपत यांनी केले तर आभार राज्य खजिनदर - राम सूर्यवंशी यांनी केले. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी, राज्य कार्यकारिणी सदस्य, पांडुरंग गव्हाणे, अध्यक्ष - छाया चव्हाण, उपाध्यक्ष - संजीव लहाने, मार्गदर्शक - योगेश वाघ, सचिव - भाग्यश्री जोगदंड, खजिनदार -रंजना भताने, संघटक बालिका सावंत सहसचिव भगवान केंद्रे, अनीता पवार, धनश्री गोसावी, सहखजिनदार - दीपक शिंदे, संभाजी केंद्रे, भागवत मुंडे, शुभम वानखेडे, सुधाकर केदार, अमित मालिशे, निशा जाधव, कृष्णा नागरगोजे, विक्रांत हुलसुरे, संतोष केंद्रे, भाग्येश्र्वर वागलगावे, सतीश माळकरी, इतर सर्व पदाधिकारी व सभासद.




नवी मुंबई महानगरपालिका उपायुक्त : कैलासजी गायकवाड यांना दैनिक महावृत्त दीपोत्सव अंक भेट देताना : कल्याणराव हनवते (सहसंपादक) तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई यांच्या वतीने दिले, व भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक : संजय झनके (गुरुजी), केंद्रीय शिक्षिका : शोभाताई कांबळे यांच्यासह ज्वेल ऑफ नवी मुंबई - लॉर्ड बुद्ध पार्क येथील सुशोभीकरण संदर्भात उपयुक्त यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली.

## संपादकीय...

# तळागाळाचा कणखर धीर हरपला

बाबा आढाव समाजकारणाच्या जगतात काही व्यक्ती अशी असतात की त्यांचे अस्तित्व गाजावत नसले तरी त्यांचा परिणाम मात्र दूरवर पसरलेला असतो. बाबा आढाव यांच्या निधनाने असा एक धीर, अशी एक शांत ताकद आणि असंघटित कामगारांसाठी झटणारी अखंड मेहनत हरवली आहे. त्यांचे जाणे म्हणजे एका संपूर्ण चळवळीची पायरीच थरथरवून सोडणारी घटना. बाबा आढाव हे नाव केवळ कामगार चळवळीपुरते मर्यादित नव्हते; ते सामाजिक न्यायाच्या व्यापक संकल्पनेशी जोडलेले होते. रस्त्यावरील व्यापारी, हमाल, मजूर, दैनंदिन कष्टावर जगणारी प्रत्येक व्यक्ती–या समाजाच्या सावलीत राहिलेल्या वर्गाला त्यांनी आवाज दिला. त्यांच्या कामाची मूलतत्त्वे साधी होती–जिथे न्याय नाही, तिथे थांबायचे नाही; जिथे अन्याय आहे, तिथे शांत राहायचे नाही. त्यांच्या कार्यपद्धतीची एक वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे त्यांनी संघर्षाला कधीही गोंगाटाचे स्वरूप दिले नाही. मोर्चे काढले, मागण्या केल्या, दबाव टाकला–पण या सर्वांसोबत संवादाची दारं सदैव उघडी ठेवली. संघर्षाला सन्मान आणि तत्त्वनिष्ठतेची चौकट देण्याचे काम त्यांनी केले. आजच्या काळात आंदोलनांची दिशा अनेकदा तात्कालिक होते. सोशल मीडियाच्या वेगात प्रश्न जिवंत राहतात तसेच विरतातही. अशा वातावरणात बाबा आढाव यांची सातत्यपूर्ण, संयमी आणि दूरगामी शैली दुर्मिळ ठरते. त्यांनी दाखवून दिले की तळागाळातील लोकांसाठी काम करणे म्हणजे केवळ घोषणाबाजी नव्हे, तर कठोर अभ्यास, जिव्हाळा आणि प्रत्यक्ष समस्यांशी भिडण्याचा धीरही लागतो. त्यांच्या निधनाने प्रश्न उभा राहतो–या वारशाची मशाल कोण उचलणार? कामगारांची असुरक्षा पूर्वीइतकीच तर आहेच, पण बदलत्या अर्थव्यवस्थेत ती अधिक गुंतागुंतीची झाली आहे. असंघटित मजूर, स्थलांतरित कामगार, अनौपचारिक रोजगार आणि वाढते शहरी ताण–या सर्व समस्यांसाठी बाबा आढाव यांसारख्या मार्गदर्शक वृत्तीची गरज अधिकच वाढली आहे. त्यांचे जाणे म्हणजे व्यक्तीचा अंत नाही, तर एका शांत, प्रामाणिक आणि तडजोड न करणाऱ्या चळवळीचे महत्त्व पुन्हा अधोरेखित करणारा क्षण आहे. समाजाने आणि राज्यकर्त्यांनीही याचा अर्थ ओळखायला हवा–की तळागाळातील लोकांची लढाई अजून संपलेली नाही. ज्या हृदयाने आयुष्यभर कष्टकऱ्यांसाठी धडधडले, त्या हृदयाचा स्पंदन थांबला असला तरी त्यांची विचारधारा, त्यांची शिस्त आणि त्यांचा संघर्ष हा समाजात पुढेही नवा आकार घेत राहणार आहे. बाबा आढाव यांना आदरांजली देण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांनी उभे केलेल्या प्रश्नांवर मनापासून काम करणे. हेच त्यांच्या कार्याला खऱ्या अर्थाने वाहिलेले पूरक असेल.

## आयुक्तांच्या खोट्या स्वाक्षरीने नियुक्तीपत्र, मनपाकडून नागरिकांना सावधानतेचा इशारा

लातूर /प्रतिनिधी: मनपा आयुक्तांच्या खोट्या स्वाक्षऱ्या करुन लिपिक पदावर नियुक्तीपत्र दिल्याचे उघड झाल्यानंतर पालिकेकडून पोलिसांना कारवाईसाठी कळविण्यात आले आहे.नागरिकांनीही सावध रहावे, असा इशाराही देण्यात आला आहे.

लातूर शहरातील शुभम बाळासाहेब गरड, श्रीमती ज्ञानेश्वरी रवी गरड, मारुती भगवान शिवणे, आदित्य बंकट भिंगे,सोमनाथ लक्ष्मण पांचाळ, बापूराव धोंडीराम हुडे यांनी आपली लिपिक पदावर नियुक्ती झाल्याचे आदेश जोडून ते आदेश अधिकृत आहेत काय? या संदर्भात माहिती मागवली होती. मनपाला याबाबत पत्र प्राप्त झाल्यानंतर त्याची शहानिशा करण्यात आली. त्यावेळी या प्रकारात मनपाचा काहीही संबंध नाही. हे नियुक्तीपत्र मनपातून देण्यात आलेले नाही. कोणीही अधिकारी किंवा कर्मचारी यात सहभागी नाही.नियुक्ती पत्र खोटे असून आयुक्तांच्या बनावट स्वाक्षऱ्या केल्याचे निदर्शनास आले.यानंतर आयुक्तांनी आदेश देऊन संबंधितांवर चौकशी करून गुन्हा दाखल करण्यासाठी शिवाजीनगर पोलिसांना कळविण्यात आले आहे.

शहरातील नागरिकांनी सावध राहून अशा प्रकारे आपली फसवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.




# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेली लोकशाहीची संकल्पना

'लोकशाही' हा शब्द खूप लोकप्रिय आहे. तथापि, लोकशाही ही संकल्पना खूप गुंतागुंतीची आहे. त्याची अशी कोणतीही सार्वत्रिक व्याख्या नाही. पाचव्या शतकातील प्राचीन ग्रीक नगर-राज्यांपासून त्याचा अर्थ सतत बदलत आहे, जिथे 'लोकशाही' या संकल्पनेचा आणि पद्धतीचा उगम शोधता येतो. 'लोकशाही' हा शब्द स्वतः ग्रीक शब्द 'डेमोस' आणि 'क्राटोस' या शब्दापासून आला आहे ज्याचा अर्थ अनुक्रमे 'लोक' आणि 'सत्ता किंवा राज्य' असा होतो. अशा प्रकारे 'लोकशाही' या शब्दाचा मूळ अर्थ 'लोकांची शक्ती किंवा राज्य' असा होतो. हे सरकारचे एक रूप आहे ज्यामध्ये लोक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे किंवा त्यांच्या निवडून आलेल्या प्रतिनिधींद्वारे स्वतःवर राज्य करतात. लोकशाहीमध्ये सार्वभौमत्व सर्वसाधारणपणे लोकांकडे असते.लॉर्ड ब्राइस यांच्या मते, लोकशाही म्हणजे असे सरकार ज्यामध्ये बहुसंख्य पात्र नागरिकांची इच्छा राज्य करते. ही व्याख्या स्पष्टपणे दर्शवते की लोकशाही ही सामान्य माणसाची राज्य आहे.

जे.आर. लुईस यांच्या मते, लोकशाही ही मुळात सरकारचा एक प्रकार आहे, परंतु एक असा प्रकार आहे जो एक चांगला समाज पुरवण्यासाठी आणि राखण्यासाठी आणि राज्यामध्ये सुव्यवस्था आणि सुरक्षितता प्राप्त करण्याच्या अनुषंगाने व्यक्तीला जास्तीत जास्त स्वातंत्र्य प्रदान करण्यासाठी अस्तित्वात आहे. जे.आर. लुईस यांनी मांडलेली लोकशाहीची व्याख्या राज्य समाजवादाच्या संकल्पनेच्या जवळ आहे, जिथे राज्याच्या भल्यासाठी व्यक्तीला जास्तीत जास्त स्वातंत्र्य दिले जाते. ड्यूई यांच्या मते, लोकशाहीचा पाया म्हणजे मानवी स्वभावाच्या क्षमतांवर विश्वास; मानवी बुद्धिमत्तेवर आणि एकत्रित आणि सहकारी अनुभवाच्या सामर्थ्यावर विश्वास. ड्यूई लोकशाहीच्या मानवी स्वभावाकडे योग्यरित्या लक्ष वेधतात.

लोकशाही जे.ए. शुम्पेटर यांच्या मते, लोकशाही म्हणजे फक्त लोकांना त्यांच्यावर राज्य करणाऱ्या पुरुषांना स्वीकारण्याची किंवा नाकारण्याची संधी मिळणे... मतदारांच्या मतासाठी भावी नेत्यांमध्ये मुक्त स्पर्धा करून.या व्याख्येनुसार असे निदर्शनास आणून दिले आहे की लोकशाहीमध्ये राज्याची खरी सत्ता सामान्य माणसाच्या हातात असते ज्याला मतदानाच्या बळावर आपला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार असतो.वॉल्टर बॅगेहॉट यांच्या मते, लोकशाही म्हणजे चर्चेद्वारे चालणारे सरकार. प्रो. सीले यांच्या मते, लोकशाही म्हणजे सरकार ज्यामध्ये प्रत्येकाचा वाटा असतो असा एक प्रकार आहे. या दोन व्याख्यांचे विश्लेषण केल्यानंतर हे समजते की लोकशाही स्वरूपात सरकारमध्ये प्रत्येकाला त्यांच्या मागण्या मांडण्याचा वाटा असतो.अब्राहम लिंकन यांनी केलेली 'लोकशाही'ची व्याख्या खूप लोकप्रिय आहे. त्यांनी 'लोकशाही' ही लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांचे सरकार अशी व्याख्या केली आहे. अशाप्रकारे, त्यांच्या मते 'लोकशाही' हा सरकारचा एक प्रकार आहे. या स्वरूपात अंतिम सत्ता लोकांकडे असते म्हणजेच लोकांचे सरकार, ते सरकार लोकांद्वारे प्रतिनिधींद्वारे चालवले जाते, म्हणून ते लोकांद्वारे सरकार असते आणि शेवटी ते लोकांच्या कल्याणासाठी चालवले जाते, म्हणून ते लोकांसाठी सरकार असते. तथापि, 'लोकशाही' हा शब्द अनेक कल्पना आणि तत्वांचे प्रतीक आहे आणि त्याच्या उत्पत्तीपासून त्याचे अनेक पैलू आहेत. अशाप्रकारे, 'लोकशाही' या शब्दाचा अर्थ वेगवेगळ्या लोकांसाठी वेगवेगळा असतो. त्याचे अनेक वेगवेगळे अर्थ आहेत.अशा परिस्थितीत, 'लोकशाही' या शब्दाचा अर्थ काय असावा हा एक अतिशय समर्पक प्रश्न आहे. तथापि, सुदैवाने, काही मानक व्याख्या आहेत ज्या व्यापकपणे स्वीकारल्या जातात. आणि, 'लोकशाही' या शब्दाच्या मूळ अर्थाबद्दल कोणतेही मतभेद नाहीत.तथापि, असे काही विचारवंत आणि तत्वज्ञानी आहेत जे सरकारच्या स्वरूपाच्या या केवळ यांत्रिक संकल्पनेच्या पलीकडे जातात आणि त्याची व्याप्ती मानवी जीवनाच्या सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रांपर्यंत वाढवण्याचा प्रयत्न करतात. ते लोकशाहीची व्याख्या माणसाच्या प्रतिष्ठेवर भर देणाऱ्या जीवनशैलीच्या संदर्भात करतात. खरं तर, लोकशाही ही केवळ सरकारचा एक प्रकार नाही तर ती सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटकांची एक जटिलता आहे, जी राज्याचे व्यक्तीशी असलेल्या संबंधांवर परिणाम करते, आवश्यक स्वातंत्र्ये, वैयक्तिक स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य किंवा संघटना आणि शासन क्रियाकलापांची हमी देते.वरील व्याख्यांवरून असे दिसून येते की व्यापक अर्थाने 'लोकशाही' बद्दल दोन व्यापक दृष्टिकोन आहेत. एक पूर्णपणे राजकीय आहे जो 'लोकशाही' ला सरकारच्या स्वरूपाच्या संदर्भात परिभाषित करतो आणि दुसरा सामाजिक-आर्थिक आहे जो 'लोकशाही' ची व्याप्ती मानवी जीवनाच्या सामाजिक, आर्थिक आणि अगदी तात्विक पैलूंपर्यंत वाढवतो.जरी अनेक व्याख्या असल्या तरी, हे लक्षात येते की केवळ जनताच चिंतेचा पाया आणि केंद्र आहे. आणि लोकांनी स्वतःच्या कल्याणासाठी सत्तेचा सुज्ञपणे वापर करावा. सत्तेवर खऱ्या अर्थाने प्रवेश असला पाहिजे. कारण या उद्दिष्टाला अनुकूल असलेल्या सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेशिवाय लोकशाही अपयशी ठरेल हे अकल्पनीय आहे.लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक अटी लोकशाहीच्या यशस्वी कार्यासाठी आवश्यक असलेल्या अटी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्टपणे सांगितल्या आहेत. त्या थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.समानता:लोकशाहीच्या यशासाठी पहिला आणि सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे समानता. डॉ. आंबेडकर म्हणतात की समाजात स्पष्ट असमानता असली पाहिजे. पीडित वर्ग नसावा आणि पीडित वर्ग नसावा. ते अब्राहम लिंकनचा उल्लेख करतात, ज्यांनी एकदा म्हटले होते की स्वतःविरुद्ध फूट पडलेले घर टिकू शकत नाही, आणि नंतरच्या विधानाचे समर्थन करतात. विभाजित समाजात रक्तरंजित क्रांतीचे जंतू असतात.त्यांचा आदर्श समाज स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वावर आधारित आहे, जो त्यांनी त्यांच्या गुरु बुद्धांकडून घेतला होता. तथापि, त्या त्रिमूर्तीमध्ये ते समानतेला प्राथमिक महत्त्व देतात.त्यांनी स्पष्ट शब्दात म्हटले की, बंधुता आणि स्वातंत्र्य हे खरोखरच व्युत्पन्न संकल्पना आहेत. मूलभूत आणि मूलभूत संकल्पना म्हणजे समानता आणि मानवी व्यक्तिमत्त्वाचा आदर. बंधुता आणि स्वातंत्र्य या दोन मूलभूत संकल्पनांमध्ये त्यांचे मूळ आहे. पुढे जाऊन असे म्हणता येईल की समानता ही मूळ संकल्पना आहे आणि मानवी व्यक्तिमत्त्वाचा आदर हा त्याचे प्रतिबिंब आहे. जेणेकरून जिथे समानता नाकारली जाते, तिथे इतर सर्व गोष्टी नाकारल्या गेल्या असे समजता येईल डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते की मानवी समाजात समानता प्रचलित असली पाहिजे, समाजात धर्म, संस्कृती, नियमांच्या बहाण्याने कोणताही भेदभाव केला जाऊ नये. भारतात त्यांच्या समानतेच्या संकल्पनेचा संदर्भ समाजातील सामाजिक समानतेकडे होता. भारतातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे, भारतीय समाज अनेक जातींमध्ये विभागला गेला होता. भारतीय समाजाचे सामाजिक नियम आणि कायदेशीर नियम असमानतेवर आधारित होते. भारतात लोकशाही स्थापित करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या असमानतेला विरोध केला. म्हणून त्यांनी भारतात लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक असलेल्या अटींपैकी एक म्हणून समानता दिली.

द्विपक्षीय व्यवस्था: लोकशाहीच्या यशस्वी कार्यासाठी दुसरी महत्त्वाची अट म्हणजे सत्ताधारी बहुसंख्य लोकांविरुद्ध मजबूत विरोध असणे. त्यांना वाटते की देशावर राज्य करणाऱ्यांच्या अधिकाराविरुद्ध प्रभावी व्हेटो पॉवर असणे आवश्यक आहे. राजाविरुद्ध व्हेटो करता येत नाही, परंतु लोकशाहीमध्ये तो सत्तेत असलेल्या पक्षाविरुद्ध वापरला पाहिजे. जोपर्यंत दोन पक्ष नसतात, एक राज्य करण्यासाठी आणि दुसरा विरोध करण्यासाठी, लोकशाही असू शकत नाही. दर पाच वर्षांनी सत्तेत असलेल्यांनी जनतेसमोर जावे आणि लोकांकडून नवीन जनादेश मिळवावा. जर जनतेचा त्यांच्यावर विश्वास नसेल, तर त्यांनी इतरांसाठी जागा मोकळी करावी. लोकशाहीमध्ये कोणालाही राज्य करण्याचा आणि दुसऱ्यांच्या कायमस्वरूपी अधीनतेचा कोणताही शाश्वत अधिकार नाही. त्यांनी स्पष्टपणे म्हटले की, जसा राजाला राज्य करण्याचा दैवी अधिकार नाही, त्याचप्रमाणे बहुसंख्य लोकांनाही राज्य करण्याचा दैवी अधिकार नाही. बहुसंख्य लोकांचा शासन केवळ मर्यादित कालावधीसाठी आणि तो बदलण्याच्या अधिकाराच्या अधीन असल्याने सहन केला जातो आणि दुसरे म्हणजे तो राजकीय बहुसंख्य लोकांचा नियम आहे, म्हणजेच बहुसंख्य ज्यांनी स्वतःला अल्पसंख्याकांच्या मताधिकाराच्या अधीन केले आहे आणि सांप्रदायिक बहुसंख्य लोकांचे नाही.

त्यांना वाटते की सांप्रदायिक बहुसंख्य आणि सांप्रदायिक अल्पसंख्यक नसून राजकीय बहुसंख्य आणि राजकीय अल्पसंख्यक असले पाहिजेत. त्यांनी योग्यच निरीक्षण केले होते की भारतात, बहुसंख्य हे राजकीय बहुसंख्य नसते. भारतात बहुसंख्य जन्माला येते. ते निर्माण होत नाही. सांप्रदायिक बहुसंख्य आणि राजकीय बहुसंख्य यांच्यातील हाच फरक आहे. राजकीय बहुसंख्य हे निश्चित किंवा कायमचे बहुसंख्य नसते. ते बहुसंख्य असते जे नेहमीच बनवले जाते, न बनवले जाते आणि पुन्हा तयार केले जाते. सांप्रदायिक बहुसंख्य हे त्याच्या वृत्तीत स्थिर असलेले कायमचे बहुसंख्य असते. कोणीही ते नष्ट करू शकतो, परंतु ते बदलू शकत नाही. त्यांच्या शब्दांत, सरकारला हुकूमशाही होण्यापासून रोखण्यासाठी दोन पक्ष आवश्यक आहेत.

कायदा आणि प्रशासनात समानता:भारतात वैदिक संस्कृती असल्याने कायदा आणि प्रशासनात समानता नव्हती. हिंदू व्यवस्थेत कायदा आणि प्रशासन व्यक्तीला त्यांच्या जातीनुसार वागणूक देत असे. वैदिक संस्कृतीत कायद्यात समान नागरी कायदा नव्हता. हिंदू न्यायव्यवस्था अन्यायावर आधारित होती. कायद्यासमोर केवळ समानताच नाही तर प्रशासनातही समानता असली पाहिजे. प्रशासनातील कर्मचारी सर्वात प्रामाणिक आणि कार्यक्षम असले पाहिजेत. प्रशासनात भेदभाव नसावा. प्रशासनाकडून कोणत्याही गुन्हेगाराविरुद्ध आवश्यक कारवाई केली जाते तेव्हा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी न्यायाच्या बाबतीत हस्तक्षेप करू नये. कोणत्याही गुन्हेगाराविरुद्ध कारवाई केली तर सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी हस्तक्षेप करू नये. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, प्रशासनातील कर्मचारी कायमस्वरूपी, भ्रष्टाचाररहित आणि कार्यक्षम असले पाहिजेत जेणेकरून सर्वांना न्याय मिळू शकेल. 'राजकीय कार्यालये' आणि 'नागरी कार्यालये' यांमध्ये फरक असला पाहिजे. ब्रिटिश सरकारने राजकीय कार्यालये आणि नागरी कार्यालये यांच्यात फरक ठेवला. अमेरिकेत 'लुटमार व्यवस्था' आता अस्तित्वात नाही. त्यांना वाटते की भारतातही प्रशासन राजकारणाच्या वर असले पाहिजे आणि कोणत्याही परिस्थितीत प्रशासनात हस्तक्षेप करू देऊ नये.

प्रशासन हे चांगले प्रतिसाद देणारे, जबाबदार आणि निःपक्षपाती असले पाहिजे; आणि ते चांगले दृढनिश्चयी असले पाहिजे. त्यांनी अधिकाऱ्यांच्या आज्ञा पाळण्याची आज्ञा दिली पाहिजे.आपल्याकडे असे सरकार असले पाहिजे, ते म्हणाले, ज्यामध्ये सत्तेत असलेले लोक देशाच्या सर्वोत्तम हितासाठी त्यांची अविभाज्य निष्ठा देतील. आपल्याकडे असे सरकार असले पाहिजे ज्यामध्ये सत्तेत असलेले लोक, आज्ञाधारकता कुठे संपेल आणि प्रतिकार सुरू होईल हे जाणून, सामाजिक आणि आर्थिक जीवनपद्धतीत सुधारणा करण्यास घाबरणार नाहीत, जी न्याय आणि समर्पणाच्या आदेशानुसार तातडीने आवश्यक आहे. तथापि, डॉ. आंबेडकरांनी असे निरीक्षण केले की भारतातील प्रशासन पूर्णपणे हिंदूंच्या हातात आहे. ते त्यांचे मक्तेदारी आहे. वरपासून खालपर्यंत ते त्यांचे नियंत्रण करते. त्यांचे एक उद्दिष्ट अस्पृश्यांशी भेदभाव करणे आणि त्यांना केवळ कायद्याचे फायदेच नव्हे तर जुलूम आणि दडपशाहीपासून कायद्याचे संरक्षण देखील नाकारणे आणि वंचित ठेवणे आहे. परिणामी अस्पृश्य हिंदू लोकसंख्या आणि हिंदूंनी ग्रस्त प्रशासन यांच्यामध्ये उभे राहतात, एक त्यांच्यावर अन्याय करते आणि दुसरी पीडितांना मदत करण्याऐवजी चुकीच्या व्यक्तीचे रक्षण करते, याच कारणामुळे त्यांनी प्रशासनाची रचना बदलण्यासाठी आणि त्यांना सांभाळण्यासाठी आणि त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी त्यांच्याच बांधवांना नोकरीत भरती करण्यासाठी दलित वर्गासाठी आरक्षणाची मागणी केली.

घटनात्मक नैतिकता:डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अगदी बरोबर म्हटले होते की, ज्या संविधानात कायदेशीर तरतुदी आहेत, ते केवळ एक सांगाडा आहे. सांगाड्याचे मांस आपण ज्याला संवैधानिक नैतिकता म्हणतो त्यात आढळते. तथापि, इंग्लंडमध्ये त्याला संविधानाचे वापर आणि परंपरा म्हणतात. इंग्लंडमधील राजकीय घटक नेहमीच त्या परंपरांना बांधील असतात. संविधानाचे त्याच्या अक्षरशः आणि आत्म्याने पालन करणे आवश्यक आहे. सार्वजनिक जीवनातील प्रत्येक नियम संविधानात प्रदान केले जाऊ शकत नाहीत. तथापि, संविधान फक्त एक सांगाडा किंवा काही मूलभूत तत्त्वे प्रदान करते आणि प्रत्येक तपशील देत नाही. कायदेशीर सांगाड्यातील तपशील निरोगी तत्त्वे किंवा परंपरांनी भरले जाऊ शकतात जे नेहमीच न्यायावर आधारित असतात आणि जे इतिहासाच्या ओघात विकसित होतात.त्यांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध न्यायालयात आव्हान देता येत नसले तरी सार्वजनिक विवेकाच्या न्यायालयात आव्हान देता येते.

ते राष्ट्रपती वॉशिंग्टन यांनी घालून दिलेल्या संरक्षणाचे कौतुकाने उल्लेख करतात, ज्यांनी स्वतःहून संवैधानिक नैतिकतेच्या आधारावर सलग तिसऱ्या कार्यकाळासाठी अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक लढवण्यास नकार दिला होता. ते राजा विंडसर एडवर्ड तिसरा यांनी घालून दिलेल्या नियमाचा उल्लेख करतात, ज्यांना संसदेच्या इच्छेविरुद्ध एका सामान्य महिलेशी लग्न केल्यामुळे सिंहासन सोडावे लागले. अशा प्रकारे संसदेने राजाचे वैयक्तिक जीवन देखील प्रतिबंधित करण्याचा अधिकार दावा केला आणि यशस्वीरित्या सुरक्षित केला.

बहुमताचा जुलूम नाही:लोकशाहीमध्ये नेहमीच दोन प्रतिस्पर्धी पक्ष राजकीय सत्ता मिळविण्यासाठी एकमेकांविरुद्ध लढण्याचा प्रयत्न करत असतात. बहुमत सिद्ध करणारा पक्ष सरकार बनवतो आणि अल्पमतातील पक्ष विरोधी पक्ष बनवतो. तथापि, बहुमत असलेल्या पक्षाकडून अल्पमतावर आपले जुलूम लादण्याची अपेक्षा केली जात नाही.

अल्पसंख्याकांना, ते म्हणतात, बहुसंख्य सरकार चालवत असले तरी, अल्पसंख्याकांना दुखापत होत नाही याची त्यांना नेहमीच खात्री वाटली पाहिजे. त्यांचे मत आहे की कोणत्याही समस्येवर संसदेत मुक्त आणि निष्पक्ष चर्चा झाली पाहिजे. अल्पसंख्याक पक्षाच्या प्रत्येक सदस्याला योग्य आदर आणि सन्मानाने वागवले पाहिजे आणि त्याचे मत काहीही असो, त्याचे ऐकले पाहिजे. प्रत्येक स्थगन प्रस्तावाला परवानगी दिली पाहिजे आणि त्यावर चर्चा केली पाहिजे. विरोधी पक्षाने राज्याच्या कारभाराच्या बाबतीत रचनात्मक टीका आणि फलदायी सूचना देऊन सत्ताधारी पक्षाला सहकार्य करावे अशी अपेक्षा आहे. ते इतके शहाणे आणि उदारमतवादी असले पाहिजेत की ते एकमेकांशी सहमत होतील किंवा कमीत कमी असहमत राहण्यास सहमत होतील. राजकीय बहुसंख्य किंवा अल्पसंख्यक असणे आवश्यक आहे, सांप्रदायिक बहुसंख्यक किंवा अल्पसंख्यक नाही. बहुसंख्य पक्षाने संसदेच्या मजल्यावर आणि संसदेच्या बाहेरही असे वातावरण पाहण्याचा प्रयत्न केला पाहिजे, ज्यामध्ये क्रांतिकारी भावना किंवा असंवैधानिक भावना विकसित होणार नाही.

. नैतिक क्रम:डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, लोकशाहीसाठी समाजात नैतिक व्यवस्था असणे आवश्यक आहे. त्यांचे मत आहे की राजकारण हे नीतिमत्तेशिवाय असू शकत नाही. सरकार कायदे करू शकते आणि त्यांची अंमलबजावणी करू शकते परंतु जोपर्यंत समाजात नैतिकता नसेल तोपर्यंत कायदा यशस्वी होऊ शकत नाही. एक राजकारणी, तो म्हणाला, केवळ राजकारणात व्यापार करत नाही, तर तो राजकारणाच्या पद्धती आणि तत्त्वज्ञान दोन्ही व्यापणाऱ्या एका विशिष्ट श्रद्धेचे प्रतिनिधित्व करतोते पुढे म्हणाले की, राजकारण ही एक प्रकारची सांडपाणी व्यवस्था बनली आहे जी असह्यपणे अप्रिय आणि स्वच्छताविषयक आहे. राजकारणी बनणे म्हणजे नाल्यात काम करण्यासारखे आहे. म्हणून त्यांचा मूल्यमुक्त राजकारणावर विश्वास नाही. एकदा त्यांनी असे म्हटले होते की, राजकारण हा बदमाशांचा खेळ बनला आहे परंतु माझ्यासाठी ते एक ध्येय आहे. तथापि, ते लोकांसमोर राजकारण कसे ध्येय असू शकते याचा आदर्श ठेवतात.सार्वजनिक विवेक:शेवटची पण सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सार्वजनिक विवेकाची स्थिती जी लोकशाही संविधानाच्या यशस्वी कार्यासाठी आवश्यक आहे. त्यांच्या मते सार्वजनिक विवेक म्हणजे विवेक जो प्रत्येक चुकीमुळे अस्वस्थ होतो, मग तो कोणाचाही असो, आणि याचा अर्थ असा की प्रत्येकजण तो विशिष्ट अन्याय सहन करतो किंवा नसो, त्याला मुक्त करण्यासाठी त्याच्यासोबत सामील होण्यास तयार असतो. ते रेव्हरंड स्कॉट यांचे एक महत्त्वाचे उदाहरण देतात, ज्याने दक्षिण आफ्रिकेतील श्वेत वांशिक वर्चस्व आणि वांशिक भेदभावापासून कृष्णवर्णीयांना मुक्त करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. जरी ते एक श्वेत पुरुष होते, तरी त्यांनी त्यांच्या श्वेत समुदायाच्या लोकांच्या भावना विचारात न घेता कृष्णवर्णीयांच्या हिताची सेवा केली. त्यांना वाटते की हे इतरांनी विशेषतः भारतीय उच्च जातींनी अनुकरण करण्यासारखे उदाहरण आहे. ते अगदी स्पष्टपणे सांगतात की भारतात सर्वत्र दक्षिण आफ्रिका आहे. तथापि, भारतात अत्याचारित लोकांचे हित साधणारी कोणतीही अनुसूचित जात का असू शकत नाही याबद्दल त्यांना विचित्र वाटते. ते योग्यरित्या म्हणतात की ते सार्वजनिक विवेक नसल्यामुळे होते.

त्यांना वाटते की दलितांना मुक्त करण्यासाठी दलितेतर लोकांनी पुढे यावे. जर ते असे करण्यात अयशस्वी झाले तर पीडित लोकांमध्ये क्रांतिकारी मानसिकता निर्माण होईल जी लोकशाहीसाठी गंभीर धोकादायक ठरू शकते.भारतातील लोकशाहीच्या यशस्वी कार्यासाठी असलेल्या परिस्थितींबद्दल त्यांचे विचार खरोखरच मोलाचे आहेत.

**अरुण वाघ**
**+९१ ९२२३२ ०३५४५**

# सोळा उपक्रमशील शिक्षकांचा पुरस्कार देऊन सन्मान

केज/प्रतिनिधी-मराठा सेवा संघ केज शाखेच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार वितरण सोहळा रविवार रोजी शिक्षणाधिकारी कार्यालय, केज येथे उत्साहात संपन्न झाला. केज तालुक्यातील उपक्रमशील शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक महादेवी फुलसुरे जि.प. प्रा.शाळा धर्माळा, मोहन ढाकणे जि.प.प्रा.शाळा सारणी (सां), व्यंकट चव्हाण जि. प.प्रा.शाळा हनुमाननगर लाडेवडगाव, संध्याराणी कोल्हे जि.प.प्रा.शाळा लाखा, सुरेखा मोराळे जि.प.प्रा. शाळा साळेगाव, नवनाथ घुगे जि. प.प्रा.शाळा होळ, रेखा धेंडे जि. प.प्रा.शाळा बोरीसावरगाव, संगीता नवले जि.प.प्रा.शाळा सोनिजवळा, नितीन हावळे जि. प.प्रा.शाळा दरडवाडी ,स्वाती वरपे जि.प.प्रा.शाळा देवगाव, बाबुराव तांबडे जि.प.प्रा. शाळा ढाकणवाडी ,बालासाहेब लोखंडे जि.प.प्रा.शाळा पांडुरंगवस्ती पैठणे, आश्रुबा गायकवाड जि. प.प्रा. शाळा बावची, पुंडलिक पोपळघट जि.प.प्रा.शाळा बोरगाव, शामल जाधव जि.प.प्रा. शाळा जाधवजवळा, मोहसिन साबेर कुरेशी जि.प.प्रा.शाळा लाखा उर्दू यांना सन्मानचिन्ह सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष गटशिक्षणाधिकारी सुनिल केंद्रे कार्यक्रमास प्रमुख पाहुणे तहसीलदार राकेश गिड्डे,जीवन विकास शिक्षण मंडळाचे सचिव जी.बी.गदळे मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नागनाथ जाधव,शिक्षण विस्तार अधिकारी दत्ता चाटे, सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले केज, ज्येष्ठ साहित्यिक हनुमंत घाडगे, डॉ.हनुमंत सौदागर जनार्धन सोनवणे, छावा चे जिल्हाध्यक्ष शिवाजी ठोंबरे शेकाप चे भाई मोहन गुंड नेते, शेकाप, गोविंद शिनगारे संभाजी ब्रिगेड चे जिल्हाध्यक्ष राहुल खोडसे मराठा सेवा संघ विभागीय सचिव रामकीसन मस्के,योगेश अंबाड आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना तहसीलदार राकेश गिड्डे म्हणाले शिक्षक हा समाजाचा दिशा-दर्शक दीपस्तंभ आहे समाजनिर्मिती करणे आणि राष्ट्राच्या विकासात योगदान देणारे नागरिक तयार करणे हे कर्तव्य शिक्षक पार पाडतात. नव्या पिढीचे शिल्पकार आहेत असे मत व्यक्त करून पुरस्कार प्राप्त शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.

केज तालुक्यात उत्कृष्ट अध्यापन करणारे अनेक शिक्षक शासकीय पुरस्कारापासून वंचित राहतात त्यांना अशा पुरस्कारातून ऊर्जा मिळते असे मत हनुमंत भोसले यांनी व्यक्त केले. मराठा सेवा संघाने उत्कृष्ट कार्यक्रमाचे आयोजन करून पुरस्काराच्या माध्यमातून शिक्षकांना केले. यामुळे अजून उत्तम काम करण्यास त्यांना प्रेरणा मिळेल असे मत सुनील केंद्रे यांनी व्यक्त केले. चांगले विद्यार्थी घडवणाऱ्या शिक्षकांच्या पाठीशी आम्ही कायम होत असे मत भाई म्हणून भाई मोहन गुंड यांनी व्यक्त केले.

चांगले अध्यापन करणारे शिक्षक नेहमी विद्यार्थ्यांच्या आठवणीत राहतात असे मत जी.बी.गदळे यांनी व्यक्त केले. गुरुजींनी दिलेल्या शिक्षणामुळेच विद्यार्थी घडत असतात असे मत हनुमंत घाडगे यांनी व्यक्त केले. पुरस्कारातून शिक्षकांना नवीन प्रयोग करण्यासाठी ऊर्जा मिळत असते असे मत डॉ.हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक युवराज हिरवे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी यशस्वीतेसाठी मराठा सेवा संघाचे जयदीप देशमुख, किशोर भालेराव, युवराज हिरवे, महादेव ढाकणे चंद्रकांत मोरे, तुषार पाटील, दयानंद खोपे, आण्णा कदम, आतिश गाढवे, राहुल देशमुख आदींनी परिश्रम घेतले.पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमास शिक्षण विस्तार अधिकारी ,शिक्षक, पालक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रम डोईफोडे यांनी तर आभार व्हि. एम.यादव यांनी केले.

# समाजभूषण : उत्तमराव तरकसे राजस्थानच्या दौऱ्यावर

राजस्थान प्रतिनिधी :- नवी मुंबई रहिवासी समाजभूषण : उत्तमराव तरकसे (आसरडोहकर) (महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक विचारवंत) हे राजस्थानची राजधानी जयपूर येथील जयपुर विकास प्राधिकरण भवन च्या सभागृहात बेहराम साहित्य कला सांस्कृतिक संस्थेच्या वतीने अखिल भारतीय हिंदी व मराठी एकदिवसीय कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते




सदर कार्यक्रमात निमंत्रित प्रमुख कवी म्हणून समाजभूषण श्री तरकसे हजर राहिले तसेच दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी राजस्थानमधील पूर्वी मेवाड राज्यातील मेवाड प्रांताची राजधानी म्हणून ओळखले जाणारे जोधपूर येथे सुद्धा एक दिवसाचे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले

सदर कार्यक्रमात सुद्धा समाजभूषण श्री उत्तमराव तरकसे हे हजर राहून त्रिसूत्री कार्यक्रमात साहित्य संस्थेच्या वतीने सातवे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आलेले होते समाजभूषण श्री तरकसे हे या कार्यक्रमास निमंत्रित कवी म्हणून हजर राहून तिन्ही कार्यक्रम उत्साहात साजरी करत समाजभूषण तरकसे यांनी जयपुर, उदयपूर, जोधपुर च्या आसपासच्या जिल्ह्यातील अलवर. भरतपुर, नागौर, अमेर, टोंक, भिलवाडा, बुंदी, पाली राजसमद, कोटा,अशा जिल्ह्यातील काही परिसरात जाऊन तेथील सामान्य नागरिकांच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आर्थिकविकास व कृषि विषयक सखोल व गांभीर्यपूर्वक विषयाचे अवलोकन केले

वरील तिन्ही संस्थेच्या आयोजकांनी समाजभूषण श्री तरकसे यांना सन्मानपूर्वक निमंत्रित केल्यामुळे त्यांनी सदर संस्थेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांचे खूप खूप आभार मानले.

# प्रभाग १४ मधून डॉ जुगलकिशोर तोष्णीवाल यांचा भाजपाकडे उमेदवारी मागणी अर्ज दाखल




लातूर : धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ जुगलकिशोर तोष्णीवाल यांनी आज आपल्या समर्थकांसह प्रभाग १४ साठी भाजपा अर्ज स्वीकृती समिती आणि भाजपा निवडणूक प्रमुख डॉ अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्याकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

अनेक सामाजिक संस्था संघटनांचे पदाधिकारी म्हणून डॉ जुगलकिशोर यांनी आपल्या कार्याची छाप पाडली आहे. लातूर जिल्हा ट्रॅव्हल्स असोशिएनचे अध्यक्ष, भाजयू मोर्चाचे उपाध्यक्ष, माझं लातूर परिवाराच्या सामाजिक उपक्रमात सक्रिय सहभाग तसेच मोफत पंढरपूर वारी, रस्ते सुरक्षा अभियान, धार्मिक कार्यात पुढाकार असलेले तरुण कार्यकर्ते म्हणून ओळख. त्यांच्या या कार्याची दखल घेत इंदोर येथील मां भुवनेश्र्वरी आंतरराष्ट्रीय विद्यापीठाने सन २०२३ साली मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित केले आहे.

डॉ जुगलकिशोर यांच्या उमेदवारीने मात्र आता प्रभाग १४ मध्ये भाजपात चांगलीच चुरस वाढल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करताना शिवप्रसाद तोष्णीवाल, विजय गवळी, प्रवीण पवार, महादेव पोलदासे, प्रभुआप्पा लखादिवे, गणेश सगर, अमोल कांबळे, माधव सूर्यवंशी, मोहन गौड, उत्तम लोंढे, झाकीर सय्यद, नरेश घंटे, ड. एकनाथ गजीले, दत्तराम कराड यांच्यासह प्रभागातील अनेक मान्यवर नागरिक आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आंबेडकरी विचारांचा निष्ठावंत कलावंत,जयेश संजय सूर्यवंशी अभिनयात उदयास येणारा नवा चेहरा.

विशेष प्रतिनिधी मुंबई - विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या घराण्याशी आणि त्यांच्या समतावादी विचारधारेशी एकनिष्ठ राहून कार्य करणारे,आणि आंबेडकरी विचारांचा निष्ठावंत कलावंत,भिम सैनिक जयेश संजय सूर्यवंशी म्हणजेच अभिनयात उदयास येणारा नवा चेहरा आहे. आपल्या सर्वांचे लाडके कलाकार जयेश संजय सूर्यवंशी आज मराठी मनोरंजन क्षेत्रात एक वेगळी छाप सोडत आहेत.

वेगवेगळ्या मराठी सिरिअल्स आणि चित्रपटांमध्ये आपल्या अप्रतिम अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकताना ते दिसत असून,तरुण कलाकारांसाठी ते एक प्रेरणादायी नाव ठरत आहेत.अभिनय क्षेत्रात नवोदित कलाकारांची होणारी फसवणूक थांबवण्यासाठी जयेश स्वतः पुढाकार घेत असून,अनेक तरुणांना योग्य मार्गदर्शन व संधी उपलब्ध करून देत आहेत. त्यांच्या या सामाजिक व कलात्मक योगदानाला सर्व समाजातून विशेष भांडुप च्या नागरिका कडून विशेष कौतुक करून निळा सलाम' करण्यात येत आहे. कोणत्याही



कलावंतच्या कला अभिनयाला जाती,धर्माचे प्रांता च्या सीमा नसतात. ते आपल्या अभिनयाने चाहत्याच्या मनावर प्रभाव टाकत असतात. त्यामुळे काही कलवंतांनी आपली जात आणि विचारधारा लपून ठेवली तर त्याला योग्य वेळी नाहक त्रास दिला जातो. हा अनुभव पाठीशी असल्यामुळेच मी आंबेडकरी विचारांचा निष्ठावंत कलावंत,जयेश संजय सूर्यवंशी अभिनयात उदयास येणारा नवा चेहरा आहे असे गर्वा ने सांगतो.म्हणूनच तो कौतुकास मान सन्मानास पात्र आहे.

जयेश सूर्यवंशी यांनी केलेल्या सिरियल्स प्रेमास रंग यावे,कोण होतीस तू काय झालीस तू,आदिशक्ती,सावळ्याची जणू सावली,लक्ष्मी निवास,लक्ष्मीच्या पावलांनी,साधी माणसं, तू ही रे माझा मितवा,तुला जपणार आहे,नशीबवान,शुभ विवाह,जय जय स्वामी समर्थ इ.बऱ्याच सिरिअल आणि चित्रपटा मध्ये अभिनयाची छाप पडली आहे. आगामी काळातही जयेश संजय सूर्यवंशी यांनी आपल्या अभिनयाच्या बळावर दिग्गज कलाकारांसोबत काम करण्याची संधी मिळावी ही अपेक्षा, करत त्याने अधिक उत्तुंग यश संपादित करावे, हीच विश्र्वशांती बुद्धविहार,महामाया बौद्ध महिला मंडळ,जमिल नगर,भांडुप (पश्र्चिम) यांनी आणि त्यांच्या चाहत्यांची आणि समाजाची मनापासून इच्छा आहे.त्यांच्या पुढील कलात्मक वाटचालीसाठी पत्रकार साहित्यिक कामगार नेते सागर तायडे यांनी मनः पूर्वक हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# रस्ता सुरक्षा जन जागृतीसाठी झेब्रु शुभंकराचा अनावरण सोहळा




नागपूर: रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने 'झेब्रु' शुभंकराचा अनावरण परिवहन विभागाचे महत्त्वाचे पाऊल आहे. या शुभंकरामुळे अपघात रोखण्यासाठी रस्ता सुरक्षा जनजागृती मोहीम अधिक प्रभावी ठरेल, असा विश्र्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

परिवहन विभागाच्यावतीने रस्ता सुरक्षा जनजागृतीसाठी झेब्रु शुभंकराचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते विधानभवन येथील मंत्री परिषद सभागृहात आयोजित सोहळ्यात करण्यात आले.

कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ, परिवहन विभागाचे अप्पर मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, वाढत्या नागरीकरणामुळे वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस भर पडत आहे. अपघात रोखण्यासाठी राज्य शासन रस्ता सुरक्षा जनजागृती मोहिमेतून नागरिकांना वाहतूक नियमांबाबत जागरूक करण्यात येत आहे. अपघात होणारच नाहीत, यासाठी नागरिकांना ' वाहतूक साक्षर' करण्याचा शासनाचा मानस आहे. या मोहिमेची ही फलश्रुती असून विविध विभागांच्या माध्यमांतून अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत.

नागरिकांनी वाहतुकीचे नियम पाळून रस्ता सुरक्षा मोहिमेत सहभाग घ्यावा. ' रस्ता सुरक्षा जीवन रक्षा' हा मूलमंत्र अंगीकारावा, असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

प्रास्ताविकात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, झेब्रु शुभंकर हा रस्ता सुरक्षेचा संदेश वाहक आहे. पहिला हक्क पादचाऱ्यांचा या जाणिवेतून रस्ता सुरक्षा मोहीम राबविण्यात येणार आहे. ' झेब्रु' ला राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्यात येणार आहे. झेब्रु रस्ता सुरक्षेचा जिवंत आत्मा ठरेल, या पद्धतीने मोहिमेची अंमलबजावणी करण्यात येईल. पदपथांवर असलेले अतिक्रमण काढून तेथील रेलिंग न काढण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगरविकास विभागाकडून नियमावली बनविण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार संबंधित विभागाकडून कार्यवाही करण्यात येईल.

कार्यक्रमात झेब्रु शुभंकरचे अनावरण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांना झेब्रु असलेले सन्मानचिन्ह देण्यात आले. कार्यक्रमाला परिवहन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# राज्यपाल आचार्य देवव्रत यांची देवलापार गो-विज्ञान संशोधन केंद्रास भेट

नागपूर, : राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज देवलापार येथील गो-विज्ञान संशोधन केंद्रास भेट दिली. यावेळी गो विज्ञान केंद्राच्या कामाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.



यावेळी वित्त व नियोजन राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, गो-विज्ञान संशोधन केंद्राचे अध्यक्ष पद्मेश गुप्ता, कोषाध्यक्ष हितेंद्र चोपकर आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

यावेळी राज्यपाल देवव्रत यांनी येथील कामधेनू पंचगव्य आयुर्वेद भवनची पाहणी केली. अवलेह विभाग, वटी, तेल, इंधन, सिरप, प्रयोगशाळा आदींना भेट दिली. येथे निर्माण होणारे फलघृत, हिंग्वाद्यघृत, अष्टमंगलघृत, गांडूळ खत निर्मिती प्रक्रिया, गोमूत्र अर्क, दंतमंजन आदी ३० पेक्षा जास्त उत्पादनांची माहितीही त्यांनी घेतली. यावेळी संशोधन केंद्राच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

रामटेक तालुक्यातील देवलापार येथील गोविज्ञान संशोधन केंद्राने देशी गोवंशाचा विकास हे प्रमुख उद्दिष्ट ठेवले आहे. दुधाएवढेच शेण आणि गोमूत्र हे घटकही महत्त्वाचे असून ते उत्पन्नाचा भक्कम पर्याय ठरू शकतात हेच संस्थेने विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीतून सिध्द केले आहे. त्याच दृष्टीने देशपातळीवरील संस्थांशी तंत्रज्ञानाबाबत करार करून विविध उत्पादने तयार केली आहेत. काही उत्पादनांना आंतरराष्ट्रीय पेटंटही मिळवण्यात संस्था यशस्वी ठरली आहे.

## धनादेश न वटल्याप्रकरणी आरोपीस दंडासह सहा महिन्याची शिक्षा

लातूर : सहा महिन्याच्या मुदतीसाठी घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी दिलेला धनादेश न वटल्याप्रकरणी लातूरचे प्रथमवर्ग ४ न्या. श्रीनिवास पांचाळ यांनी आरोपीस ४ लाख ३० हजार रुपयांच्या दंडासह सहा महिन्याची शिक्षा सुनावली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, लातूर येथील हत्ते नगरचे रहिवासी तोशीब युनुस आलमेलकर ( हा.मु.श्रीकृष्ण नगर, मळवटी रोड, मळवटी) यांनी राजकुमार नागनाथ कापसे यांच्या सिद्धेश्वर मनिलेंडर्स ( शासनमान्य फायनान्स ) कडून दि. २६ मे २०२० रोजी सहा महिन्याच्या मुदतीसाठी व्यवसाय व कौटुंबिक गरजांसाठी दोन लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. या कर्जाची सहा महिन्यांची मुदत उलटून गेली तरीही त्यांनी सिद्धेश्वर मनिलेंडर्सला पैसे परत दिले नाहीत. या रकमेच्या वसुलीसाठी राजकुमार कापसे यांनी सतत तगादा लावला असता तोशीब आलमेलकर यांनी महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेच्या मार्केट यार्ड शाखेचा २ लाख २० हजार रुपयांचा धनादेश सिद्धेश्वर मनिलेंडर्सच्या नावाने दिला होता. तो धनादेश देय तारखेला इंदिरा महिला नागरी सहकारी बँक, शाखा गांधी मार्केट लातूर येथील खात्यावर लावला. मात्र, सदरचा धनादेश खात्यावर पुरेशी रक्कम उपलब्ध नसल्याच्या कारणावरून न वटता परत आला.

धनादेश परत आल्यानंतरही राजकुमार कापसे यांनी तोशीब आलमेलकर यांच्याकडे पैशाची मागणी केली. त्यावेळी आरोपीने पैसे देण्यास टाळाटाळीचे धोरण अवलंबल्याने अखेर कापसे यांनी याप्रकरणी कलम १३८ नुसार प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी - ४ न्यायाधीश श्रीनिवास एच. पांचाळ यांच्या न्यायालयात रितसर तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी सुनावणी होऊन आरोपीने जाणीवपूर्वक फसवणूक केल्याचे निदर्शनास आल्याने त्याला ४ लाख ३० हजार रुपये दंड व सहा महिन्यांची शिक्षा सुनावली. याप्रकरणी फिर्यादी राजकुमार कापसे यांच्या वतीने ॲड. नसीर एच. शेख यांनी काम पाहिले . त्यांना ॲड. अजित टेकाळे , ॲड. वसीम शेख, ॲड. प्रवीण शिंदे यांनी सहकार्य केले.

## १३ डिसेंबरपासून लातूरमार्गे पंढरपूर - तिरुपती साप्ताहिक रेल्वेसेवा सुरु होणार : निलेगांवकर

लातूर : येत्या दि. १३ डिसेंबर २०२५ पासून पंढरपूर- तिरुपती व्हाया लातूर साप्ताहिक रेल्वेसेवा सुरु होणार असल्याची माहिती मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागीय सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी दिली.

पंढरपूरमार्गे तिरुपती रेल्वे सेवा सुरु करण्यात यावी, अशी मागच्या अनेक वर्षांपासूनची प्रवाशांची मागणी होती. रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी दि. १० ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या रेल्वे सल्लागार समितीच्या महत्वपूर्ण बैठकीत ही मागणी आग्रहाने लावून धरली होती. त्यांनी ही रेल्वेसेवा लातूरमार्गे पंढरपूर - तिरुपती सुरु करण्याच्या दृष्टीने सकारात्मक प्रयत्न केले. त्यांच्या मागणीनुसार दक्षिण मध्य रेल्वे विभागाने गाडी क्रमांक ०७०१२ व ०७०१३ ही तिरुपती पंढरपूर - तिरुपती साप्ताहिक रेल्वे सेवा लातूरमार्गे सुरु करण्यास नुकतीच मंजुरी दिली आहे. येत्या दि. १३ डिसेंबर २०२५ शनिवार पासून ही गाडी सुरु होणार आहे. गाडी क्रमांक ०७०१२ ही दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजून ४० मिनिटांनी तिरुपतीहून सुटेल.ही गाडी काचीगुडा, सिकंदराबाद, बिदरमार्गे दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. १४ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजून २० मिनिटांनी लातूर स्थानकावर पोहचेल. ही गाडी सायंकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी पंढरपूर स्थानकावर पोहचेल. गाडी क्रमांक ०७०१३ ही दर रविवारी पंढरपूरहून रात्री आठ वाजता निघेल. ही गाडी मध्यरात्री १२ वाजून १० मिनिटांनी लातूर रेल्वे स्थानकावर पोहचेल तर दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवारी रात्री साडेदहा वाजता तिरुपती स्थानकावर पोहचेल. या गाडीला एक एसी प्रथमवर्ग, एक एसी फर्स्ट कम टू टिअर , दोन एसी टू टिअर , ६ एसी थ्री टिअर , ९ स्लीपर क्लास, दोन द्वितीय श्रेणी कम दिव्यांग एसएलआर असे एकूण २३ डबे असणार आहेत. ही सुविधा तूर्तास दि. १३ डिसेंबर ते दि. २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत सुरु असणार आहे. प्रवाशांच्या मिळणाऱ्या प्रतिसादावर या गाडीची पुढील रूपरेषा निश्चित केली जाणार असल्याचे संजय निलेगांवकर यांनी सांगितले. याशिवाय या बैठकीत हरंगुळ रेल्वे स्थानकाची प्लॅटफॉर्मची उंची आणि लांबी वाढविणे, लातूर - पुणे - खडकी इंटरसिटी रेल्वे सेवा सुरु करणे आदी विषयांवरही महत्वपूर्ण चर्चा झाल्याची माहिती निलेगांवकर यांनी दिली.

## शिरूर घाट पं.स.गणातून श्री दत्ता धस निवडणूक लढणार; भाजपाने उमेदवारी देण्याची नागरिकांची मागणी



केज/प्रतिनिधी- बीड जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांची लवकरच तारीख जाहीर होणार असल्याने या निवडणूकीची अनेकांनी तयारीही सुरु केली असल्याचे चित्र सध्या पहायला मिळत आहे. केज तालुक्यातील नांदुर घाट जिल्हा परिषद गट हा ओ.बी.सी. महिलेला आरक्षित सुटला असुन नांदुर घाट गटातील शिरूर घाट पंचायत समिती गण हा ओबीसी पुरुषासाठी आरक्षित सुटला असुन शिरूर घाट प.स.गणातून निवडणुकीसाठी सांगवी येथील भाजपाचे बीड जिल्हा चिटणीस श्री दत्ता धस निवडणूकीसाठी उत्सुक असुन त्यांनी शिरूर घाट गणातील गावागावात गाठीभेटी सुरु केल्या असुन या गाठीभेटीला मतदार ही त्यांना चांगला प्रतिसाद देत आहेत.केज तालुक्यातील नांदुर घाट जि.प. गटांच्या अंतर्गत येत असलेल्या शिरूर घाट पंचायत समिती गण हा असल्याने येथील सर्वसाधारण ओबीसी पुरुषासाठी आरक्षित आहे या शिरूर घाट पचायत समीती गणाची निवडणूक भाजपाचे बीड जिल्हा चिटणीस दत्ता धस लढवण्यासाठी उत्सुक असुन. त्यांचा या भागात चांगला जनसंपर्क असल्याने शिरूर घाट पंचायत समीती गणातील गावातील मतदारच त्यांनी निवडणूक लढवण्याची मागणी करु लागल्याने दत्ता धस यांनी देखील मतदारांच्या आग्रहा नुसार शिरूर घाट गणातील गावागावात गाठीभेटी सुरु केल्या असुन या गाठीभेटीला मतदारही त्यांनाचांगला प्रतिसाद देत आहेत.

## श्री संत बाळूमामा यांची परज व महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन

केज/प्रतिनिधी-केजी येथे शुक्रवार रोजी श्री संत बाळूमामा यांची परज व महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी केज तालुक्यातील भाविक भक्त व नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन चादर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.



शुक्रवार दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०-३० वाजता केज शहरातील चादर यांच्या निवासस्थान येथून शिक्षक पतपेढी पासून श्री संत बाळूमामा यांची परज निघणार आहे सदर परजेचा कार्यक्रम हा शिक्षक पतपेढी पासून उमरी रोड मार्गे उमरी रोडवरील श्री संत बाळूमामा मंदिर येथे परज पोहोचणार आहे. श्री बाळूमामा मंदिर येथे परज आल्या नंतर श्री संत बाळूमामांची आरती झाल्यानंतर दुपारी १-३० ते ५ वाजेपर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

या महाप्रसादाचे अन्नदाते म्हणून दादाराव मल्हारी लांडगे हे अन्नदानाचे काम करणार आहेत. तरी या कार्यक्रमास केज शहरासह परिसरातील भाविक भक्त व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन चादर परिवाराच्या वतीने करण्यात आलेले आहे.

## असंघटित शोषित पिढीत वंचित श्रमिकाचाआधारस्तंभ हरपला.

बुद्ध ,फुले ,शाहू, शिवराय आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवतावादी सत्यशोधक चळवळीचे अग्रगण्य नेते , जातिभेद गाडण्यासाठी एक गाव एक पाणवठ्याचे राखणदार ,असंघटित श्रमिक,हमाल, रिक्षाचालक आणि बांधकाम मजुरांना न्याय हक्क सामाजिक सुरक्षा आणि सन्मान मिळवून देण्यासाठी संपूर्ण जीवन समर्पित करणारे श्रमिकांचे आधारस्तंभ , पुरोगामी चळवळीतील ज्येष्ठ सामाजिक नेते बाबा आढाव यांनी ८ डिसेंबर २०२५ रोजी वयाच्या ९५ व्या वर्षी पुण्याच्या हॉस्पिटल मध्ये जगाचा अखेरचा निरोप घेतला.वयाच्या ९५ वर्षी पर्यंत सामाजिक कार्यात सक्रिय असलेले बाबा आढाव यांना आदराने पुणे शहराचे कुटुंब प्रमुख म्हटले जाते.ही त्यांच्या महान कार्याची पोच पावती आहे.बाबासाहेब पांडुरंग आढाव यांचा जन्म १ जून १९३० साली पुण्यात झाला.गरीब घरातील बाबा आढाव यांचे बालपण शिक्षण आणि कार्य पुण्यातील असले तरी त्यांचे नाव भारतवर्ष आणि साता सुंदरपार सर्वांना परिचित आहे. कारण शोषित पिढीत, वंचित ,आणि आदिवासी समाजावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी बाबा आढाव नेहमीच आघाडीवर राहिले .

महात्मा फुले यांना अपेक्षित असलेला सत्यशोधक समाज निर्माण करण्यासाठी बाबा आढाव यांनी जीवन समर्पित केले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.कारण त्यांनी वर्ग, जाति आणि स्त्री-पुरुष यात समानता येण्यासाठी अनेक आंदोलने केली १९५२ साली पडलेल्या दुष्काळात अन्नधान्याचा काळाबाजार आणि महागाई विरोधी जनआंदोलन केले. १९६२ मध्ये महाराष्ट्र सरकारच्या पुनर्वसन धोरणा विरोधात आंदोलन केले. १९७२ सालचा महादुष्काळ दलितांना पाण्यासाठी वनवन भटकावे लागत असताना 'एक गाव, एक पाणवठा ' हे आंदोलन सुरु करून समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.त्याचा परिणाम 'एक गाव, एक पाणवठा ' नावाने राज्यभर पाणवठ्याच्या ठिकाणी स्मारक उभारण्यात आली. कष्टकरी कामगारांना दुपारच्या वेळी जेवण मिळण्यासाठी कस्टाची भाकरी योजना' सुरू केली.त्याचे अनुकरण झुणका भाकर नंतर सरकारने शिवस्थाळी सुरू केली असंघटित कामगार यांना देखील सामाजिक सुरक्षा आणि पेंशन मिळण्यासाठी बाबा आढाव यांनी २०१२ साली राष्ट्रीय पेंशन अदालत सुरू केली. असंघटित कामगारसाठी मोलकरियन पंचायत, शिक्षा पंचायत, कागद काचपत्रा कष्टकरी पंचायत स्थापन केली.ज्यांची कोणीच दखल घेत नव्हते. त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम बाबा आढाव यांनी केले. पुण्यातील महात्मा फुले समता प्रतिष्ठानचे अध्यक्ष असलेले बाबा आढाव यांना शोषित पिढीत वंचित आदिवासी समाजाला न्याय देण्यासाठी ५० वेळ तुरुंगवास भोगावा लागला.संविधानला नाकारणारे आणि संविधान विरोधक यांना त्यांनी नेहमीच परखड मत मांडली.सामाजिक परिवर्तन करणारे परखड वक्ते तसेच परखड लेखक होते.त्यांची एक गाव, एक पाणवठासत्यशोधनाची वाटचाल आणि हमाल पंचायत ही पुस्तक फारच गाजली.त्यांना पुण्यभूषण पुरस्कार (२००६) 'मॅन ऑफ द इयर': द वीक (ढ्हश थशशज्ञ) मासिकाद्वारे सन्मान (२००७).सामाजिक जीवनगौरव पुरस्कार: टाइम्स ऑफ इंडिया सोशल इम्पॅक्ट जीवनगौरव पुरस्कार (२०११).ने सन्मानित करण्यात आले.

मनोहर भिडे यांनी पुरोगामी महाराष्ट्रातील संत परंपरा आणि आध्यात्मिक वारीला बदनाम करण्यासाठी वारीत धारकरी घुसविण्याचा प्रयत्न सुरू केला.त्याला चेक देण्यासाठी बाबा आढाव यांनी पुण्यातील महात्मा फुले वाड्यातून समतेच्या वारीला सुरुवात केली.त्याचा परिणाम ही समतेची वारी संपूर्ण महाराष्ट्रातून निघत असून वारीतुन बुद्ध डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांगणारे अनेक महाराज तयार झाले.विठ्ठल हा बुद्धच होता हे वारकरी पटवून देत आहेत.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतर बाबा आढाव यांनी देखील ही एक समतेची क्रांती केल्याचे बहुजनानी मान्य केले पाहिजे . अशा पुरोगामी ,परिवर्तनवादी , क्रांतिकारी नेत्याला डॉ.बाबा आढाव यांना फुले ,शाहू ,शिवराय आणि आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्राच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली!

**आनंद म्हस्के आंबेडकरी विचारवंत**
**८९२८५६४३२५**

## धान खरेदीबाबत शेतकऱ्यांना अधिक मदतीसाठी शासकीय यंत्रणांनी दक्षतेने काम करावे - मंत्री प्रा. अशोक वुईके



नागपूर: आदिवासी बहुल गडचिरोली, गोंदिया व इतर जिल्ह्यात धान कापणी सुरु झाली आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रात आदिवासी विकास महामंडळामार्फत आपण आधारभूत किंमत धान खरेदी योजना शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरु केलेली आहे. ही योजना अत्यंत पारदर्शीपणे राबविल्यास कोणत्याही खासगी व्यापाऱ्याकडून पिळवणूक होणार नाही. प्रत्येक वेळी शासनाने आखून दिलेल्या नियमांचे पालन स्थानिक यंत्रणाकडून सक्षमपणे होत नसल्याने उत्तम योजना असूनही शासनाला टिकेचे धनी व्हावे लागते. हे टाळण्यासाठी आदिवासी विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, महसूल विभाग व इतर संबंधित विभागानी अत्यंत जबाबदारीने काम करणे आवश्यक असल्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके यांनी स्पष्ट केले.

धान खरेदीबाबत त्यांच्या अध्यक्षतेखाली येथील नियोजन सभागृहात राज्यपातळीवरील आढावा घेण्यात आला. या बैठकीस आदिवासी विभागाचे सचिव विजय वाघमारे, आदिवासी विकास आयुक्त लिना बनसोड, अपर आयुक्त आयुषी सिंह, उपसचिव ह. व्यं. आरगुंडे, राजश्री सारंग व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

धान खरेदीचे धोरण हे नवे नाही. यात बारदाना, वाहतूक, अंदाजपत्रकासाठी धान उत्पादकाने नेमक्या किती क्षेत्रावर धानाचे उत्पादन घेतले याची माहिती विभागाकडे अगोदरच असायला हवी. यात धान पेऱ्याची (ई-पीक पेरा नोंद) नसल्याने शेतकऱ्याने किती क्षेत्रावर धानाचा पेरा केला याची अचूक माहिती उपलब्ध होत नाही. यादृष्टीने योग्य ते वेळत तांत्रिक नियोजन केले पाहिजे. याचबरोबर पुरेशा प्रमाणात गोडाऊनची निर्मिती होणे आवश्यक असून शासनाच्या विविध योजनेचा लाभ या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांपर्यंत कसा पोहचविता येईल यासाठी अधिकाऱ्यांनी लक्ष घालण्याचे निर्दे श दिले.

## शीघ्र प्रतिसाद देणाऱ्या वैद्यकीय पथकांचे नियोजन करा - विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम

नाशिक (जिमाका): नाशिक - त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यात रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होण्यासाठी महानगरपालिका, जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग आणि जिल्हा शल्यचिकित्सकांनी सूक्ष्म नियोजन करावे. आवश्यक तेथे फिरते आणि शीघ्र प्रतिसाद देणा-या आरोग्य पथकांचे नियोजन करावेत, असे निर्देश विभागीय आयुक्त तथा नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिले.




जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आज दुपारी सिंहस्थ कुंभमेळा कामांबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील (ग्रामीण), जिल्हा शल्य चिकित्सक डॉ चारुदत्त शिंदे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, लेखा व कोषागारे विभागाचे सहसंचालक बी. डी. पाटील, उपजिल्हाधिकारी रवींद्र भारदे, पोलिस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, आरोग्य विभागाचे सहायक संचालक डॉ. योगेश चित्ते, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र बागूल,यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

डॉ. गेडाम म्हणाले की, कुंभमेळ्यानिमित्त देश- विदेशातून भाविक येतील. त्यांच्यासाठी अद्ययावत, दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी. त्याबरोबरच रुग्णालयांचे श्रेणीवर्धन, अतिदक्षता कक्ष कार्यान्वित ठेवावा. त्यासाठी आवश्यक वैद्यकीय अधिकारी आणि अन्य मनुष्यबळ गुणवत्तापूर्ण असावे. साधुग्राम, घाट परिसरात दोन्ही बाजूला, वाहनतळ, रेल्वे स्थानक, बसस्थानक, आखाड्याच्या ठिकाणी, पर्यटनस्थळांच्या तसेच पोलिस, आरोग्य सेवक, स्वच्छता कर्मचारी आदी अत्यावश्यक सेवेच्या कर्मचाऱ्यांच्या निवासाच्या ठिकाणी आरोग्य पथक, रुग्णवाहिका, आवश्यक औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध करून ठेवावा. तसेच पोलिसांच्या मदतीने रुग्णालयांपर्यंतचा मार्ग निश्चित करावा.

याबरोबरच परिसरातील शासकीय, निमशासकीय, खासगी रुग्णालये, तेथे उपलब्ध असलेल्या आरोग्य सेवा, उपलब्ध यंत्रसामग्री यांचीही माहिती संकलित करून ठेवावी. कुंभमेळ्यात सेवेसाठी येणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची निवास व्यवस्था अद्ययावत आणि दर्जेदार राहील याची दक्षता घ्यावी. नाशिकबरोबरच त्र्यंबकेश्वर येथेही याच प्रकारच्या आरोग्य सेवा उपलब्ध करून द्याव्यात, अशाही सूचना विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी दिल्या.

कुंभमेळा आयुक्त सिंह यांनी कुंभमेळा कालावधीत द्यावयाच्या आरोग्य सेवेबाबत मार्गदर्शन केले. महानगरपालिका आयुक्त खत्री यांनी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून, तर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शिंदे, आरोग्य विभागाचे सहायक संचालक डॉ. चित्ते यांनी जिल्हा, उपजिल्हा आणि ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवेची सविस्तर माहिती दिली. तसेच कुंभमेळ्याच्यादृष्टीने करण्यात येत असलेल्या नियोजनाचे सादरीकरण केले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.